



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १९८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२८ फेब्रुवारी २०२५


## थोडक्यात

### पन्नास फूट खोल विहिरीत पडला बिबट्या...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, बुलडाणा :** तब्बल पन्नास फूट खोल विहिरीत पडलेल्या बिबट मादीला बुलढाणा वन विभागाच्या 'रेस्क्यू टीम'ने अथक परिश्रम करून संकट मुक्त केले! तिला पिंजऱ्याच्या सहाय्याने सुखरूप बाहेर काढून जीवदान देण्यात आले आहे. या बिबट मादीला वरिष्ठ वन अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर ज्ञानगंगा अभयारण्यात काल मंगळवारी रात्री उशिरा सोडण्यात आले. वनविभागाच्या वरिष्ठ सूत्रांनी आज बुधवारी, २६ फेब्रुवारीला दुपारी दिली आहे. काल पंचवीस फेब्रुवारी रोजी दुपारी मोताळा वन परीक्षेत्रातील रोहीणखेड वर्तुळ (sarkal) मधील मौजे रोहीणखेड शिवारातील गट क्रमांक चारशे सत्तावीस मधील शेख आसीफ शेख कालु यांच्या मालकीच्या शेतातील ५० फुट खोल विहिरीत एक बिबट पडल्याचे दिसून आले.

पाण्यात बुडण्याच्या भीतीने सदर बिबट विहिरीतील कपारीत जाऊन बसले होते.शेत मालक आणि परिसर वासियांकडून याची माहिती मोताळा वन विभागाला देण्यात आली.यावर वन कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळ गाठून पाहणी केली. विहिरीची खोली आणि एकंदर परिस्थिती लक्षात घेऊन बिबटच्या सुटकेसाठी बुलढाणा येथून वन विभागाच्या बचाव पथकाला पाचरण करण्यात आले. घटनास्थळी पोहोचलेल्या पथकाकडून या बिबट्याचे 'फिजिकल रेस्क्यू' करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दोऱ्याच्या साह्याने पिंजरा विहिरीत सोडण्यात आला. अथक प्रयत्न केल्यानंतर अखेर बिबट्याने पिंजऱ्यात प्रवेश केला. नंतर पिंजरा विहीरीतून बाहेर काढून बिबटयाला सुखरूप बाहेर काढण्यात आले.

# ताई म्हणत आधी जवळीक साधली, मग लैंगिक अत्याचार केला !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, पुणे :** पुण्यातील स्वारगेट एसटी आगारात बुधवारी (२६ फेब्रुवारी) पहाटे एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्काराची घटना घडली. पुण्यात नोकरी करणारी तरुणी फलटन येथे आपल्या मूळ गावी जाण्यासाठी पहाटे आगारात आली होती. एसटीची वाट पाहत असताना आरोपी दत्तात्रय गाडे हा तिथेच घुटमळत होता. तरुणीला ताई अशी हाक मारत आरोपीने तिचा विश्वास संपादन करत संवाद सुरू केला. ती कुठे जात आहे, याची माहिती घेऊन तिला फलटणला जात असलेली बस दुसरीकडे उभी असल्याचे सांगून शिवशाही बसमध्ये घेऊन गेला आणि तिथे तिच्यावर बलात्कार केला, अशी माहिती पुणे डिसीपी झोन २ च्या उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी दिली.



एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना स्मार्तना पाटील म्हणाल्या की, आरोपी गाडेने ताई तू कुठे चालली? असा प्रश्न विचारून आधी तिची माहिती काढली. त्यानंतर तिने फलटनचे नाव घेतल्यानंतर तिला बस दुसरीकडे लागत असल्याचे सांगितले. त्यानंतर तिला बसमध्ये बसवतो, असे सांगून तिला बसमध्ये नेले. हे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहे. बसमध्ये अंधार असल्याचे पीडितेने सांगितले होते. मात्र तू मोबाइलचा टॉर्च सुरू करून आतमध्ये प्रवाशी आहेत का? हे बघ असे आरोपीने सांगितले. पीडित तरुणी बसमध्ये चढताच आरोपी मागून गेला आणि दरवाजा बंद करून घेतला. त्यानंतर त्याने पीडितेवर अत्याचार केला.

**स्वारगेट बलात्कार प्रकरणात आतापर्यंत काय घडले?**

- अत्याचार केल्यानंतर आरोपी तिथून निघून गेला. त्यानंतर पीडितेने दुसरी बस पकडून फलटनच्या दिशेने प्रवास सुरू केला होता. मात्र तिने यादरम्यान आपल्या मित्राला फोन करून सदर घटनाक्रम सांगितला. मित्राने दिलेल्या सल्ल्यानुसार पीडित तरुणी हडपसरला बसमधून उतरली आणि तिने पोलीस ठाणे गाठून झालेला प्रकार कथन केला.
- या घटनेची माहिती बाहेर आल्यानंतर माध्यमे आणि स्थानिक राजकीय पुढाऱ्यांनी स्वारगेट आगारात धडक दिली. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते वसंत मोरे यांनी स्वारगेटमधील सुरक्षा रक्षकाच्या कार्यालयाची तोडफोड केली.
- पोलिसांनी घटनेचा तपास करत असातना सीसीटीव्ही चित्रण तपासून आरोपीचे नाव दत्तात्रय गाडे असल्याचे सांगितले. गाडे सराईत गुन्हेगार असून तो सध्या जामिनावर बाहेर होता. याआधीही त्याच्यावर महिलांना लुटण्याचे गुन्हे दाखल झालेले आहेत.
- स्वारगेटच्या घटनेनंतर खासदार सुप्रिया सुळे, विधानपरिषदेच्या सभापती नीलम गोऱ्हे, माजी आमदार रवींद्र धंगेकर, राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी संताप व्यक्त केला आहे. विरोधकांनी पुण्यातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.
- या घटनेनंतर स्वारगेट आगरातील २३ सुरक्षा कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्या जागी आता नवे सुरक्षा रक्षक नेमले जाणार आहेत, अशी घोषणा राज्य सरकारने केली.
- गुरुवारीही या घटनेचे पडसाद उमटलेले पाहायला मिळत आहेत. पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी १३ पथके रवाना केली आहेत. गाडेच्या कुटुंबियांची आणि मित्र-मैत्रिणींची चौकशी सुरू आहे.
- पुणे पोलिसांनी आरोपी दत्तात्रय गाडेची माहिती देणाऱ्यास एक लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येईल, अशी घोषणा केली आहे.
- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बसस्थानकप्रमुख व आगार व्यवस्थापकांची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत विभागीय चौकशी करण्याचे तसेच दोषी आढळल्यास तत्काळ निलंबित करण्याचे निर्देश व्यवस्थापकीय संचालक विवेक भीमनराव यांना दिले.

# अलिबागमध्ये दोन एसटीमध्ये चिरडून १७ वर्षीय मुलाचा मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, अलिबाग :** अलिबाग शहरात दोन एसटी बसच्या मध्ये चिरडून १७ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेचे तीव्र पडसाद शहरात उमटले. अपघातानंतर संतप्त जमावाकडून एसटी बसेसची तोडफोड करण्यात आली. पोलिसांनी शिघ्र कृती दलाला पाचारण करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

पनवेलहून अलिबागला येणाऱ्या एसटी बस चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने, त्याने बस स्थानकासमोर एका दुचाकी, तीन आसनी रिक्षा आणि समोरील एसटी बसला धडक दिली. या अपघातात १७ वर्षीय दुचाकीस्वाराचा दोन्ही बसच्या मध्ये चिरडून मृत्यू झाला. जयदीप शंकर बना असे या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. या घटनेचे तीव्र पडसाद शहरात उमटले. संतप्त जमावाने दोन्ही बसेसची दगडफेक करून तोडफोड केली. बस चालकाला आमच्या ताब्यात द्या म्हणून अशी मागणी करत वाहतूक रोखून धरली. त्यामुळे अलिबाग शहरात प्रचंड तणाव निर्माण झाला होता. पोलीसांनी जमावास शांत करण्याचा प्रयत्न केला मात्र सतप्त जमाव ऐकण्याच्या मानसिकतेत नव्हता. अपघाताचे चित्रिकरण करण्याचा प्रय़त्न करणाऱ्यांनाही संतप्त जमावाच्या रोषाला सामोरे जावे लागले. अलिबाग पोलीसांसह, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस मुख्यालयातील वाढीव पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. यानंतर शिघ्र कृती दल आणि दंगल नियंत्रण पथकासही घटनास्थळी पाचारण करण्यात आले.



अप्पर पोलीस अधिक्षक अभिजीत शिवथरे यांच्यासह, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी संतप्त जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला.

ही परिस्थिती लक्षात घेऊन आंबेडकर चौकाकडून महावीर चौकाकडे जाणारी दोन्ही बाजूची वाहतूक पोलीसांनी रोखून धरली होती. या परिसरातील दुकाने आणि हॉटेल्सही काही काळ बंद करण्यात आली आहे. अलिबाग आगारातून होणारी एसटी वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाश्यांचे हाल होत आहेत.

# पिंपरी चिंचवड, नाशिक शहर किशोरी (मुली) गटाच्या अंतिम फेरीत



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मनमाड :** पिंपरी चिंचवड, नाशिक शहर यांनी ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या किशोरी गटात अंतिम फेरी गाठली. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असो. च्या विद्यमाने मनमाड नाशिक येथील स्व. माणकचंद ललवाणी इस्टेट (हेलिपॅड) मैदानातील मॅट वर सुरू असलेल्या उपांत्य सामन्यात पिंपरी चिंचवडने चुरशीच्या लढतीत सांगलीचे आव्हान ४७-४५असे संपुष्टात आणले. पहिल्या डावात लोण देत पिंपरी चिंचवडने २७-१६ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात सांगलीने लोणची परतफेड करीत ही आघाडी ३३-३७ अशी कमी केली. पण सांगलीला अंतिम फेरी गाठण्यात अपयश आले. संतोषी थोरवे, समृद्धी लांडगे, आरती पतंगे यांच्या चढाई पकडीच्या खेळाला पिंपरी चिंचवडच्या विजयाचे श्रेय जाते. सानिका पाटील, उत्कर्षा पाटील, श्रेया भिलवडे यांनी दुसऱ्या डावात जोरदार लढत देत सामन्यात रंगत आणली. पण संघाला विजयी करण्यात त्या थोड्या कमी पडल्या.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात यजमान नाशिक शहरने परभणीचा प्रतिकार ५७-४९ असा मोडून काढत अंतिम फेरी गाठली. आक्रमक सुरुवात करीत पहिला लोण देत नाशिकने १०- ०७ अशी आघाडी घेतली. पुन्हा आणखी दोन लोण देत आपली आघाडी विश्रांतीपर्यंत ३७-२२ अशी केली. परभणीने पूर्वार्धात १३ तर उत्तरार्धात ९ बोनस असे एकूण २२ गुण घेतले. पण ते एकच लोण देऊ शकले. बिंदिशा सोनार, ईशा दरोळे, जयवंती वाघुळ यांच्या चढाई पकडीच्या खेळाने नाशिकचा विजय सोपा केला. यशश्री इंगळे, सोनाली नावकीकर, दिपा चोपरा यांचा खेळ परभणीचा पराभव टाळण्यास कमी पडला.

# प्रत्येक बसस्थानक व आगारांचे तातडीने सुरक्षा परीक्षण करावे - परिवहन मंत्री सरनाईक

**दि.२७, मुंबई :** राज्यातील सर्वच बसस्थानक व आगारांचे तातडीने सुरक्षा परीक्षण करण्यात यावे. तसेच बसस्थानक व आगारांमध्ये असलेल्या निर्लेखित बसेस व परिवहन कार्यालयांकडून कारवाईमध्ये जप्त केलेल्या वाहनांचे १५ एप्रिलपर्यंत निष्कासन करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसस्थानकावर असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याच्या सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिल्या. बसस्थानकांमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षा विषयक आढावा बैठक अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या दालनात झाली. बैठकीला परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव व एसटी महामंडळाचे अध्यक्ष संजय सेठी, परिवहन आयुक्त व एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय (प्रभारी) विवेक भीमनवार, सहसचिव राजेंद्र होळकर, एस टी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

बसस्थानक परिसरातील निर्लेखित बसेस निष्कासनासाठी विहित कालावधी निश्चित करुन १५ एप्रिलपर्यंत ही कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. राज्य परिवहन महामंडळाकडे मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी पद असून या



रिक्त पदावर भारतीय पोलीस सेवेतील (खझड) अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. याबाबत प्रस्ताव गृह विभागाला विनाविलंब सादर करण्याच्या सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यभरात सर्वच एसटी बसस्थानके व आगारांमध्ये सीसीटीव्हीची 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत यंत्रणा उभारण्यात यावी. नवीन बसेसमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात यावे. बसेसमध्ये 'जीपीएस' यंत्रणा बसविण्याचे काम गतीने पूर्ण करण्यात यावे. पोलिसांची मदतीने बसस्थानकात गस्त वाढवण्यात यावी, आगार व्यवस्थापक हे त्या आगाराचे पालक असल्यामुळे त्यांनी तेथील निवासस्थानामध्येच वास्तव्य करावे. जेणेकरून २४ तास त्यांच्या निरीक्षणाखाली आगाराचे व्यवस्थापन चालेल. याबरोबरच बसस्थानकावर काम करणाऱ्या प्रत्येक एसटी कर्मचाऱ्याला ओळखपत्र देण्यात यावे, जेणेकरून कर्मचारी असल्याचे भासवून प्रवाशांना कोणी लुबाडणार नाही.

बसस्थानक अथवा आगारांमध्ये आलेल्या प्रत्येक बसची नोंदणी सुरक्षा रक्षकाकडे होणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच चालक – वाहक यांनी आगारात आणलेली बस सोडताना ती बंद असल्याची खात्री करावी. बसचे दरवाजे बंद करण्याची काळजी घ्यावी व साध्या बसेसमध्ये दरवाजासह खिडक्याही बंद असल्याची खात्री करावी. बस स्थानकांवर असलेल्या सुरक्षा रक्षकांनी परिसरात फिरणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर लक्ष ठेवून त्यांच्यावर योग्य कारवाई करावी, असे निर्देशही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले.

बसस्थानकांत स्वच्छतेबाबत कुठलीही तडजोड करण्यात येवू नये. प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यात याव्यात. प्रत्येक बसस्थानकात महिलांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी. ही स्वच्छतागृह प्रशस्त असावीत, 'एसटी'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वच्छतेसंदर्भात वेळोवेळी आढावा घेत राहणे आवश्यक आहे, असे निर्देश परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले.

अक्षराज

# संपादकीय



## विज्ञान दिन...

संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय शास्त्रज्ञ सर सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्टयपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला होता. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस उत्साहाने साजरा करतात.

भारतासाठी पहिले नोबेल पारितोषिक मिळवून देणारे जेष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न सर सी व्ही रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी भौतिक शास्त्रातील अत्यंत म हत्त्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकीरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोध निबंधाला १९३० साली म ान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पारितोषिक मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजेच १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान म्हणून साजरा म्हणून साजरा केला जातो. रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयात रामन हे अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते इंग्रजी आणि विज्ञानामध्ये पदवीधर झाले तर १७ व्या वर्षी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रासमध्ये उच्च श्रेणीमध्ये पूर्ण केले. त्यांनतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल पदावर रुजू झाले झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून अध्यापन करीत असतानाही त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. १९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले. तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये भारतीय तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला. पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याची नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रमार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतूहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का दिसते असा प्रश्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यामधून प्रकाशाचे विकिरण यावर संशोधन सुरू केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले. रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच. प्रकाशाचे विकिकरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकारचे किरण सरळ जेंव्हा आपल्या डोळ्यांत शिरतात, तेंव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. रामन हे सुरवातीला स्फटिकांच्या अणू रचनेसंबंधी आढळणाऱ्या रचना साधर्म्याशी अपवादात्मक असा अभ्यास करत होते. या दरम्यान १९२८ साली त्यांना असे आढळून आले की विकिरीत प्रकाशामध्ये मूळ प्रकाशाइतक्या तरंग लांबीच्या किरणांबरोबर इतरही प्रकाश किरणांचे अस्तित्व असते, ज्यांचा मागमूसही मूळ प्रकाश किरणांमध्ये नव्हता. या नवीन किरणांचा जास्त अचूक अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाऱ्याच्या विद्युतदीपघटापासून मिळणारी तरंग लांबी अभ्यासली आणि त्यातून त्यांच्या नवीन निष्कर्षाला, संशोधनाला बळकटी मिळाली. प्रकाशामध्ये कण स्वरूपाशी साधर्म्य सांगणारे काही गुणधर्म असतात, त्यांच्या प्रकाश कनिकांमधील ऊर्जा ही त्या प्रकाशाच्या कंपन संख्येच्या समप्रमाणात असते. त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत मौलिक आणि आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहेत त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफ ेक्टमुळे माहितीचे भांडार खुले झाले. त्यामुळेच देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्मानीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संशोधन संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा विध्वंसक कार्यासाठी त्याचा उपयोग होऊ नये असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या सर्व भारतीयांना मनापासून शुभेच्छा!

# ॥ विद्यार्थी मित्रांनो, विज्ञानाकडे वळा ॥

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.वसंतराव गोवारीकर सन १९८७ साली भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव असताना त्यांनी ज्या अनेक योजना सुरू केल्या त्यातील एक योजना म्हणजे देशात विज्ञानाचे वातावरण निर्माण करण्यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे. डॉ.वसंतराव गोवारीकरांच्या म नात आले की भारतात विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार डॉ.सी.व्ही.रामन यांना मिळाला आहे, तर त्यांच्याशी संबंधितच तो दिवस असावा. शिवाय तो त्यांचा जन्म अथवा मृत्युदिन निवडण्यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी त्यांचा निबंध जगप्रसिद्ध नेचर या विज्ञान मासिकाला पाठवला आणि ज्याला पुढे सन १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख का निवडू नये? अखेर जी तारीख निघाली ती २८ फेब्रुवारी ही होय.



डॉ.सी.व्ही. रमन यांचा जन्म तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली आणि शिक्षण चेन्नई येथे झाले. त्यांनी कोलकाता विद्यापीठात सन १९१७-१९३३ भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ.रमन हे काही काळ बंगलोरातही होते, १९४७ साली ते रमन संशोधन संस्थेचे संचालक झाले. त्यांचे दि.६ मे १९०७ रोजी लोकासुंदरी अम्मलबरोबर लग्न झाले होते. त्यांना चंद्रशेखर आणि रेडिओ-खगोलशास्त्रज्ञ राधाकृष्णन हे दोन पुत्र होते. डॉ.रमन हे चंद्रशेखर सुब्रह्मण्यन यांचे काका होते. सन १९८३मध्ये चंद्रशेखर यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. हिंदू तमिळ ब्राह्मण पालकांच्या पोटी जन्मलेले रमन हा एक अनमोल मुलगा होता. त्याने सेंट अलॉयसियसच्या अँग्लो-इंडियन हायस्कूलम धून अनुक्रमे ११ आणि १३ वर्षांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. वयाच्या १६ व्या वर्षी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात सन्मानाने त्यांनी मद्रास विद्यापीठात पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. पदवीधर विद्यार्थी असताना सन १९०६ साली त्यांचा पहिला संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आला. पुढच्या वर्षी त्यांनी एमएची पदवी मिळवली. कोलकाता येथील इंडियन फायनान्स सर्व्हिसमध्ये असिस्टंट अकाउंटंट जनरल म्हणून रुजू झाले, तेव्हा ते १९ वर्षांचे होते. तेथे त्यांची इंडियन असोसिएशन फॉर द अप्लाइन्शन ऑफ सायन्स- आयएसएस या भारतातील पहिल्या संशोधन संस्थेशी ओळख झाली, ज्यामुळे त्यांना स्वतंत्र संशोधन करण्याची परवानगी मिळाली आणि ध्वनी आणि ऑप्टिक्समध्ये त्यांनी मोठे योगदान दिले. रमन यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. ऑक्टोबर

- संकलन व सुलेखन -
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

१९७०च्या शेवटी रमण त्यांच्या प्रयोगशाळेत कोसळले; त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले आणि डॉक्टरांनी त्यांना चार दिवस जगण्यासाठी मुदत दिली. ते वाचले आणि काही दिवसांनी त्यांनी रुग्णालयात राहण्यास नकार दिला, कारण त्यांनी त्यांच्या अनुयायांनी वेढलेल्या त्यांच्या संस्थेच्या बागेमध्ये मरणे पसंत केले. रमनच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी त्यांनी आपल्या एका माजी विद्यार्थ्यास सांगितले, अकादमीच्या नियतकालिकांना म रण येऊ देऊ नका, ते देशात विज्ञानाच्या गुणवत्तेचे संवेदनशील संकेतक आहेत. ती संध्याकाळ, रमन यांनी आपल्या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाशी भेट घेण्यात आणि त्यांच्याबरोबर संस्थेच्या व्यवस्थापनासंबंधी कार्यवाहीबद्दल त्यांच्याशी चर्चा करण्यात घालवली. दि.२१ नोव्हेंबर १९७०च्या रात्रीनंतर रमन यांचा दुसऱ्या दिवशी पहाटे नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाला. सन १९१७मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या राजाबाजार विज्ञान महाविद्यालयात आशुतोष मुखर्जी यांनी त्यांना भौतिकशास्त्राचे पहिले पालित प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. आपल्या पहिल्या युरोप दौऱ्यात भूमध्य समुद्र पाहून त्याला समुद्राच्या निळ्या रंगाचे वर्णन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी १९२६ मध्ये इंडियन जर्नल ऑफ फिजिक्सची स्थापना केली. त्याने आणि कृष्णन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाश विखुरल्याची एक अभिनव घटना शोधून काढली, ज्याला त्यांनी सुधारित विखुरणे असे संबोधले, पण त्याला रामन परिणाम म्हणून ओळखले जाते. भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. रमन सन १९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये पहिले भारतीय संचालक बनले. तेथे त्यांनी त्याच वर्षी इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना केली. त्यांनी सन १९४८ साली रमन रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली. तेथे त्यांनी शेवटच्या काळात काम केले. त्यांच्या रमन परिणाम- प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरिंग या शोधासाठी ते ओळखले जातात. सन १९३०चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक रमन यांना मिळाले होते.

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे उद्दिष्ट असे की, लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन दरवर्षी साजरा केला जातो. मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि विज्ञान क्षेत्रात विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. देशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करण्यासाठी. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे आणि त्यांना प्रेरित करणे आणि विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही. विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसिद्ध करण्यासोबतच देशातील नागरिकांना या क्षेत्रात संधी देऊन नवीन उंची गाठणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे.

देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक विचारांचा प्रसार आवश्यक आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनासारखे कार्यक्रम वैज्ञानिक वृत्तीचा प्रसार करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकतात. विज्ञानाच्या माध्यमातूनच आपण समाजातील लोकांचे जीवनम ान अधिकाधिक सुखी करू शकतो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय आणि इतर विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान अकादमी, शाळा आणि महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था यासारख्या सर्व विज्ञान संस्थांमध्ये या दिवशी विविध वैज्ञानिक उपक्रमांशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले जातात. महत्त्वाच्या कार्यक्रम ांमध्ये भाषणे, निबंध, शास्त्रज्ञांचे लेखन, विज्ञान प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन, परिसंवाद आणि परिसंवाद इत्यादींचा समावेश होतो. विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदानासाठी राष्ट्रीय आणि इतर पुरस्कारही जाहीर केले जातात. विज्ञानाची लोकप्रियता वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात आले आहेत.

**!! राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या समस्त भारतीय भावाबहिणींना हार्दिक शुभेच्छा !!**

## गौरव मराठीचा..

मराठीभाषी कपाळा
अभिजातटिळागौरव
तपश्चर्या आली फळा
सफळ संपूर्ण आग्रव

लाभले भाषेचेवरदान
कृतकृत्य होती मानव
भाषा विवाद पसरवी
कुवृत्तीचे पिसाटदानव

अखिलविश्वा विश्वास
कळेलं ममत्व मार्दव
कधी पंचपक्वान्न वाटे
बनते ती चविष्टसौंधव

दिपतीलं छात्रांचे अक्ष
अद्वितीय मराठीवैभव
पहा तर बोलून मराठी
काहीचं नाही असंभव

भाषासोपी शिकावयां
सरलेताचा ये अनुभव
अतर्क्य तशी सखोल
सौंदर्य दिपव अभिनव


मानेअन्यभाषाभगिनी
कुणांस नसतो उपद्रव
अक्षरे बनती मौक्तिक
स्नेहभावे जरासे गिरव

मराठी अमूल्य दागिना
शारदेच्या कर्णी तानव
चांदणे शब्दालंकारांचे
भाषांगणी हसरी पुनव

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# विचार थकले की विकार होतात!

असं म्हटलं जातं की,' माणूस हा विचारशील प्राणी आहे. ' संपूर्ण प्राणीमात्रा मध्येच नव्हे ,तर एकूणच जीवसृष्टीमध्ये विचार करण्याची क्षमता फक्त माणसांम ध्येच आहे. माणूस हा सतत विचार करत असतो. अग बाई अरेच्चा ! हा एक मराठी सिनेमा आला होता. त्यामध्ये महिला सतत मनातल्या मनात बोलत असल्याचे दाखवण्यात आले होते. अर्थातच त्यांचे बोलणे हे विचार करणे होते. अशाप्रकारे माणूस मनातल्या मनात सतत बोलत असतो ; म्हणजेच विचार करत असतो. असं सतत विचार करून माणसाचं मन थकत. कारण ते सर्व विचार निर्थक असतात. अशा मन थकलेल्या व्यक्तीला अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. अशी व्यक्ती समोर अचानक एखादी समस्या आल्यास गंगारुन जाते. काय करावं ते त्याला सुचत नाही. म्हणून एकांतात असल्यानंतर सतत विचार करणं आपण टाळालं पाहिजे. हे जरी म ानसशास्त्रीय दृष्टिकोन योग्य असला ,तरी म ाणसाने नेहमी शास्त्रीय, पुरोगामी, नीतिमान, व्यवहारी, सर्वसामावेशक विचाराची कास धरली पाहिजे. योग्य विचारांचे चिंतन केले पाहिजे. महापुरुषांचे,संतांचे आणि शास्त्रीय दृष्टिकोन देणारे विचार आत्मसात केले पाहिजेत. असे विचार आत्मसात करण्याचे आपण जर थांबवले, अर्थात आपले विचार थकले तर आपल्याला विकार होतात. विकार होतात म्हणजेच शारीरिक आजार होतात असं नाही, तर माणूस मनाने कमजोर होतो. त्याची वैचारिक प्रगती खुंटते. वाचन, प्रवचन, समुपदेशन, व्याख्यान , शिक्षण, प्रशिक्षण आणि प्रसार माध्यमे याच्या मधून माणसाला अनेक विचार मिळत असतात.



त्या विचारांवर विचार करून ; तो योग्य की अयोग्य ठरवण्याचा निर्णय घेतला पाहिज. आपले नातेवाईक, मित्रमंडळी आणि एकूणच समाज आपल्याला अनेक विचार देत असतो. यामध्ये प्रेरणा, स्फूर्ती, चेतना, सन्मार्ग, व्यवहार ज्ञान, खऱ्या खोट्याची जाण असे अनेक सकारात्मक विचार असतात. काही वेळा हिंसा, निंदा द्वेष आणि कपट-कारस्थान करण्यास लावणारे देखील विचार असतात. या साऱ्या विचारांच्या सरमिसळी मधून' निर क्षीर विवेक बुद्धी' वापरून योग्य विचार निवडण्याची कला आत्मसात केली पाहिजे.

समोरच्या व्यक्तीच्या कृतीचे, बोलण्याचे आणि त्याच्या व्यवहाराचे चिंतन करून निर्णय घेण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. आज महिलांवरील अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात वाचनात येतात. अल्पवयीन मुलींना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्याचे शिक्षण शाळांमधून दिले जाते. अर्थातच या अल्पवयीन मुलींनी या अगोदर जन्मल्यापासून असा विचार कधीच केलेला नसतो. आपल्या जवळील नात्यातील मामा, काका किंवा शेजारील दादा आपल्याला असा स्पर्श करू शकतो याची जाणीव त्यांना होते. त्या मुली सावध होतात. पुढील अनर्थ टाळतो. अशाप्रकारे योग्य विचार समाजात पेरण्याचे काम म हापुरुषांनी, शास्त्रज्ञांनी, समाज सुधारक, समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ञ आणि चिकित्सक विचारवंतांनी केलेआहे . हे विचार काळाच्या कसोटीवर उपयोगी पडतात का? हे पाहून त्या विचारावर मार्गस्थ झाले पाहिजे.

नवनवीन विचार घेतले पाहिजेत. सतत वाचलं पाहिजे. वाचलेल्या घटकावर चिंतन व मनन केले पाहिजे. विचार थकू न देण्यासाठी वाचन हे फार मोठं टॉनिक आहे. विचारांना गती देण्याचं काम वाचन करतं. मनात निर्माण होणारे विकार घालवण्याचे काम वाचन करतं. वाचनाने माणूस विचारशील,कृतिशील, विचारवंत आणि ज्ञानवंत बनतो. 'सूर्य पृथ्वीभोवती फिरतो',हा सिद्धांत ज्या काळात रूढ होता त्या काळात गॅलिलिओने 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते', हा शास्त्रीय सिद्धांत इटलीच्या समुद्रकिनाऱ्यावर समुद्रांच्या लाटांचे निरीक्षण करत असताना म्हणजेच विचार करत असतानाच सुचला. म्हणजेच योग्य दिशेने केलेल्या विचारांम ध्ये फार मोठी ताकद असते. जगातील अनेक समस्या या माणसाच्या डोक्यात येणाऱ्या विचारातूनच सुटल्या आहेत. तेव्हा आपले विचार थकणार नाहीत याची दक्षता आपण घेतली पाहिजे. सतत जाणीवपूर्वक डोळसपणे विचार करत राहिलं पाहिजे.

- किशोर जाधव, सोलापूर
मो.९९२२८८२५४१

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मराठी लोकजीवनात जिवंत असल्यामुळे अभिजात आहे - डॉ. गडपायले



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२७, पालम (परभणी) :** मराठी ही भाषा जनमानसात व लोक जीवनात प्राचीन कालखंडापासून जिवंत असल्यामुळे ती अभिजात आहे. मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेमुळे आज संपूर्ण महाराष्ट्राला देशात वेगळा सन्मान मिळतो असे प्रतिपादन भाषा अभ्यासक प्रा.डॉ.संजय गडपायले यांनी गुरुवार, दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी केले. ते शहरातील माधवराव पाटील महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्त कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आत्माराम आरसुळे हे होते. तर विभाग प्रमुख डॉ.भारत शिंदे, डॉ कालिदास गुडदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. गडपायले म्हणाले की, मानवी समाज आणि संस्कृतीला कायम जिवंत ठेवण्यासाठी माणसाची मातृभाषा महत्त्वाची भूमिका बजावत असते, जोपर्यंत मराठी भाषेत ज्ञान निर्मिती होणार नाही तोपर्यंत ती व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी भाषेला टक्कर देऊ शकत नाही.म्हणून मराठीत मोठ्या प्रमाणात ज्ञान निर्मिती झाली पाहिजे .यावेळी डॉ.भारत शिंदे, डॉ.गुडदे यांनीही आपले विचार मांडले. कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना डॉ.आरसुळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी श्रवण आणि वाचन या माध्यमातून आपली भाषा समृद्ध करून स्पर्धेच्या युगात टिकले पाहिजे. मिळालेल्या शिक्षणाच्या संधीचा लाभ घेऊन आपले जीवन आपण स्वतः घडविले पाहिजे. यासाठी विविध लेखकांनी जो आपला अनुभव ग्रंथाच्या माध्यमातून लिहिला आहे तो सर्वांनी वाचला पाहिजे. या कार्यक्रमात निबंध स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु.नेहा घोसले यांनी तर सूत्रसंचालन मुस्कान शेख यांनी केले, तर आभार निकिता गायकवाड यांनी मानले. यावेळी विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## ढोकेश्वर विद्यालयात मराठी भाषा दिन उत्साह साजरा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** गेल्या दिड ते २ हजार वर्षापासून प्र.के.अत्रे, शांता शेळके, कवी कुसुमाग्रज, बाळशास्त्री जांभेकर, संत बहिणाबाई, पु.ल.देशपांडे यासारख्या अनेक मराठी संत महात्म्यांनी, साहित्यिकांनी मराठी भाषेच्या समृद्धीसाठी आपलं आयुष्य खर्ची घातलं त्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी शब्द ही अपुरे पडतात म्हणूनच या वर्षी आपल्या मराठी भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असे पारनेर तालुका खरेदी - विक्री संघांचे चेअरमन ॲड.रघुनाथ उर्फ बाबासाहेब खिलारी यांनी आपल्या साहित्यीक शब्दातून सांगितले. टाकळी ढोकेश्वर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषेला आपल्या साहित्याने समृद्ध करणाऱ्या कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस म्हणजेच मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. रघुनाथ खिलारी होते. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुनिल वाव्हळ, पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी, ज्येष्ठ पत्रकार बबनराव गायके सर, प्रसाद महाराज खिलारी, ग्रामपंचायत सदस्य बापूसाहेब रांधवन, पत्रकार साई कोरडे प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी पत्रकार बबनराव गायके, पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी, रवींद्र मते, प्रसाद महाराज खिलारी यांनी मराठी भाषेबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी गायके म्हणाले की, मराठी भाषा ही इतर देशात पोहचली आहे. आपल्या महाराष्ट्रात मराठी बद्दल भरपूर ग्रंथ संपदा उपलब्ध आहे. तिचे वाचन आपण सर्वांनी केले पाहिजे. याप्रसंगी विद्यालयाने लेझीम, झाँज, टाळ, मृदूंग, वीणा इत्यादी सह पालखी मधे ग्रंथ दिंडी काढून विविध वेशभूषा करून आपल्या चालीरिती, परंपरा जपणारे एक लोकगीत साजरे केले. याप्रसंगी विजय सोबले, संदीप महांडुळे, मल्हारी वाघसकर, नारायण शेळके, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे, सुरेखा ठाणगे, वैशाली गायखे, सोनल रोहकले, पवन कुटे, सोमनाथ होरणे, अनुष्का कांबळे, अनिता म्हस्के, वर्षा भोंडवे, सोनाली माळवदे, विष्णू भद्रे, सुशांत खेडकर इत्यादी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवींद्र मते, कल्पना जाधव, निलम खिलारी, अतुल सैद, वैशाली ढोकळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब निवडुंगे यांनी केले तर आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले.

## मराठी भाषा दिनानिमित्त समता विद्या मंदिर शाळेतील विद्यार्थ्यांची ग्रंथ दिंडी



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२७, मुंबई :** कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज यांची जयंती देशभरात मराठी राजभाषा दिवस म्हणून उत्साहात साजरा केली जाते. साकीनाका येथील समता विद्या मंदिर शाळेतील इयत्ता पाचवी ते नववीतील विद्यार्थ्यांनी गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी राजभाषा दिनाचेनिमित्त साधत ग्रंथ दिंडी काढली. समता शिक्षण संस्थेचे सचिव राजेश सुभेदार, कार्याध्यक्षा ज्योती सुभेदार यांच्या संकल्पनेतून या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९ ते ११ वाजे पर्यंत ही दिंडी साकीनाका परेरावाडी पासून टिळक नगर, असल्फा मार्गे टाळ, मृदंग, वीणा चां निनाद करत काढण्यात आली.

महाराष्ट्र ही संताची, समाजसुधारकांची भूमी असल्याने या दिंडीत स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, जगदगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, एकनाथ, मुक्ताई, कवी कुसुमाग्रज, पू.ल.देशपांडे, आण्णाभाऊ साठे, मधू मंगेश कर्णिक यांची वेशभूषा करणारे विद्यार्थी या दिंडीत सहभागी होऊन समाजाला मराठीचा जागर, मराठी भाषा वाचवा मराठीचा अभिमान बाळगा असा मोलाचा संदेश देण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका गीता बलोदी, वैशाली हांडे, प्रतीक्षा गोरे, मोरकर, भरत भोईर, रेश्मा चासकर, राहुल सोनावणे आदी शिक्षकांनी दिंडी यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# वाहनांच्या काचा तोडुन बॅग लिफ्टींग करणाऱ्या टोळीस अटक

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२७, ठाणे :** दि.२६ फेब्रुवारी २०२५ रोजी गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे यांना माहिती मिळाली की, घोळ गणपती, पुजा पंजाब हॉटेल जवळ, महापे रोड, ठाणे पश्चिम या ठिकाणी पार्किंगमध्ये उभ्या केलेल्या वाहनाच्या काचा तोडून वाहनातील बॅग व किमंती मुददेमाल चोरी करणारे इसम येणार आहेत. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेच्या पोलीस पथकाने घोळ गणपती, पुजा पंजाब हॉटेल जवळ, महापे रोड, ठाणे प. येथे सापळा रचला असता, तेथे त्यांना दोन इसम संशयास्पद स्थितीत मोटर सायकलवर दिसले. त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असताना सदर इसम हे नवी मुंबईच्या दिशेने पळून जावू लागल्याने पोलीस पथकाने त्यांचा पाठलाग करुन त्यांना दर्शन लॉज जवळ, वाशी, सेक्टर ११, नवी मुंबई या ठिकाणी पकडले व त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत त्यांनी त्यांची नावे -

१) अरविंद दिनेश जाटव, वय २६ वर्षे, रा. ग्राम-जगमोहनपुरा, जिल्हा-भरतपुर, राज्य-राजस्थान



२) साहिल कुमार रमेशचंद जाटव, वय २४ वर्षे, रा.ग्राम जगमोहनपुरा, आनंदनगर कॉलनी, जिल्हा भरतपुर, राज्य राजस्थान व सध्या दर्शन लॉज, जुहूनगर, वाशी, नवी मुंबई असे सांगितले. तसेच त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी ठाणे, नवी मुंबई परिसरातील शिळडायघर, खारघर, पनवेल तालुका, कोपर खैरणे या पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटार सायकल व बॅग लिफ्टींगचे ०४ गुन्हे केले असल्याची कबुली दिली असून वरील चारही पोलीस ठाण्याचे गुन्हे उघडकीस आले आहे.

सदर आरोपींच्या ताब्यातून वाहनांच्या कावा फोडण्यासाठी वापरण्यात येणारे ब्रेकर, मोटर सायकल, चोरलेल्या बॅगा, कागदपत्रे तसेच पेपर स्प्रे ची बॉटल इत्यादी मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदर प्रकाराबाबत आरोपीविरूध्द शिळडायघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. । २०२/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२), ३२४ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयाच्या पुढील तपासकामी त्यांना शिळ डायघर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कामगिरी अमरसिंह जाधव, पो. उप आयुक्त, गुन्हे, शेखर बागडे, सपोआ, शोध-१, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि/सचिन गायकवाड, सपोनि यादव, पोउपनिरी/घुगे, पोउपनिरी/पाटील, सपोउपनिरी/नाईक, सुनिल माने, पोहवा/सोनकडे, प्रशांत निकुंभ, धनंजय आहेर, चापोहवा/शशिकांत सावंत, पोलीस अंमलदार सागर सुरळकर, मयुर लोखंडे, सर्व नेम. गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे यांच्या पथकाने केली आहे.

# अफूच्या झाडांची लागवड करणारा गजाआड

## ११ लाख ४३ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, शेवगाव (अहिल्यानगर) :** अफूच्या झाडाची आपल्या शेतात बेकायदेशीररित्या लागवड करणार्या संशयित आरोपीस शेवगाव पोलीस पथकाने ११ लाख ४३ हजार ६०० रुपये किमतीच्या मुद्देमालासह गजाआड केले. गणेश नवनाथ घोरतळे (वय २२, रा. मारुती वस्ती, बोधेगाव, ता. शेवगाव) असे संशयित आरोपीचे नाव आहे.



गणेश घोरतळे याने बंदी असलेल्या अफूच्या झाडाची बोधेगाव शिवारात त्याच्या शेतामध्ये बेकायदेशीररित्या लागवड केल्याची माहिती पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांना गुप्त बातमीदार मार्फत मिळाली. त्यांनी पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या पथकासह छापा टाकला. घोरतळे याने अंदाजे चार गुंठे क्षेत्रामध्ये शासनाने लागवडीस बंदी घातलेल्या अफूच्या झाडांची बेकायदेशीररित्या लागवड केली असल्याचे आढळून आले.


मुद्देमालाचा पंचनामा करून त्यामध्ये अफूची ९५३ लहान मोठी झाडे, बोंड असलेली झाडे जप्त केली. त्याचे अंदाजे वजन ३९.६८५ किलो इतके आहे. पोलीस कॉन्स्टेबल श्याम बाबासाहेब गुंजाळ यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, शेवगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगावचे पोलीस निरीक्षक समाधान नागरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक धरम सिंग सुंदरडे, अशोक काटे, पोलीस हेडकॉन्स्टेबल चंद्रकांत कुशारे, किशोर काळे, पोलीस कॉन्स्टेबल संतोष वाघ, राहुल खेडकर, भगवान सानप, प्रशांत आंधळे, एकनाथ गडकर, संपत खेडकर, महिला पोलीस कॉन्स्टेबल प्रियांका निजवे, पोलीस कॉन्स्टेबल राहुल गुड्डू यांच्या पथकाने केली.

# पाथर्डी येथे मुलाला कॉपी पुरवताना नायब तहसीलदार ताब्यात

## शासनाचे कॉपी पुरवणाऱ्यांवर बडतर्फीचे आदेश; नायब तहसीलदाराला बडतर्फ करणार का ?

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पाथर्डी (अहिल्यानगर) :** पाथर्डी तालुक्यातील परीक्षा केंद्रावर नायब तहसीलदाराला कॉपी पुरवताना रंगेहाथ पकडले आहे. तोरडमल असे या रंगेहाथ पकडलेल्या नायब तहसिलदारांचे नाव असल्याचे माहिती समोर आली आहे. आता शिक्षकांप्रमाणे नायब तहसीलदारावर कारवाई होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बारावी बोर्ड परीक्षा मध्ये स्वतः च्या पाल्यालाच कॉपी पुरवत असल्याची माहिती समोर आली आहे. पाथर्डी तालुक्यातील तनपुर वाडी परीक्षा केंद्रावर



ही घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. संबंधित नायब तहसिलदारांवर नेमकी काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यंदा बोर्डाच्या परीक्षा कॉपी मुक्त वातावरणामध्ये घेता याव्यात म्हणून कठोर नियमावली राबवली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश दिले आहेत. पण आता नायब तहसीलदार आपल्या पाल्याला कॉपी पुरवताना रंगेहाथ पकडल्या गेल्याने त्यांच्यावर काय कारवाई होणार? शिक्षकांसारखे त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई होणार का असा सवाल उपस्थित केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून बोर्ड परीक्षेच्या परीक्षा केंद्र भागात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनधिकृत व्यक्तींना पूर्ण प्रतिबंध घालण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देताना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल) जवळ ठेवणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी. भरारी पथकाव्दारे कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित असल्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले होते.

# घर-शाळा प्रवासाची जबाबदारी शाळांची

## विशेष समितीच्या अहवालाने उच्च न्यायालयात खळबळ

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२७, डोंबिवली (ठाणे) :** बदलापूर येथील शाळेतील लैंगिक अत्याचाराच्या धक्कादायक घटनेच्या पार्श्वभूमीवर, शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक शिफारशी करणारा अहवाल विशेष समितीने उच्च न्यायालयात सादर केला आहे. या अहवालात शाळेच्या बसमधून प्रवास करताना मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शाळेचीच असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, शाळांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना सुचवण्यात आल्या.

निवृत्त न्यायमूर्ती साधना जाधव आणि न्यायमूर्ती शालिनी जोशी-फणसाळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हा अहवाल न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सादर केला. समितीत माजी आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांच्यासह अनेक शिक्षणतज्ज्ञ आणि मानसोपचारतज्ज्ञांचा समावेश होता.

यावेळी न्यायालयाने सरकारला आदेश दिले की, अहवालाचा अभ्यास करून दोन आठवड्यांत त्यावर भूमिका स्पष्ट करावी आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी काय उपाययोजना केल्या जातील, हे सादर करावे.

**विशेष समितीने शाळेतील मुलांच्या सुरक्षिततेसाठी खालील महत्त्वाच्या शिफारसी सुचवल्या आहेत –**

१) शाळेच्या परिसरात आणि बसमध्ये मुलांची जबाबदारी शाळेची असावी.

२) शाळांच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अनिवार्य करावे.

३) शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांची पोलिसांकडून चारित्र्य पडताळणी करावी.

४) मुलांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श यामधील फरक शिकवण्यासाठी विशेष मार्गदर्शन द्यावे.

५) मुलांना सायबर गुन्ह्यांबद्दल जागरूक करण्यासाठी शाळेत विशेष कार्यशाळा घ्याव्यात.

६) १०९८ हा टोलफ्री हेल्पलाइन क्रमांक प्रमुख ठिकाणी प्रदर्शित करावा.

बदलापूर येथील अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य सरकारने ही समिती स्थापन केली होती. सुरुवातीला सहा सदस्य असलेल्या समितीचा सप्टेंबर २०२४ मध्ये विस्तार करून त्यात सात सदस्यांचा समावेश करण्यात आला.

शहर आणि ग्रामीण भागातील शाळा वेगवेगळ्या समस्यांना तोंड देतात, त्यामुळे त्या लक्षात घेऊन समितीत मुख्याध्यापक, मानसोपचारतज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञांचा समावेश करण्यात आला.

अहवाल सादर करताना न्यायालयाने स्पष्ट केले की, सरकारने या शिफारसी तातडीने अंमलात आणाव्यात आणि अंतिम अहवाल येईपर्यंत मुलांच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत, हे स्पष्ट करावे. तसेच, पोक्सो कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीही शिफारशी करण्यात आल्या आहेत.

बदलापूर घटनेनंतर मुलांच्या सुरक्षिततेबाबत मोठ्या प्रमाणावर चिंता व्यक्त केली जात आहे. या अहवालानंतर सरकार आता कोणते ठोस निर्णय घेते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# ठाणे महापालिकेने ८१ अनधिकृत शाळांच्या विरोधात केली पोलिसांत तक्रार

## ६८ अनधिकृत शाळांच्या विरोधात एफ.आय.आर दाखल


**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७, दिवा (ठाणे) :** ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ८१ अनधिकृत शाळा असून त्यात १९७०८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या सर्व ८१ शाळांच्या विरोधात ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाने पोलिसात तक्रार दाखल केली आहे. त्यापैकी ६८ शाळांच्या विरोधात पोलिसांनी एफआयआर नोंदवला असून उर्वरित १३ अनधिकृत शाळांविरोधात एफआयआर नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. अनधिकृत शाळांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी त्यांचे इतर अधिकृत शाळांत समायोजन करण्यासाठी ठाणे महापालिका प्रयत्नशील आहे.

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अनधिृकत शाळांच्या स्थितीचा नुकताच आढावा घेतला. या शाळांची नोंदणी नाही. काही अनधिकृत शाळा अनधिकृत इमारतीत आहेत. काही अनधिकृत शाळा निवासी इमारतीत भाड्याच्या जागेत असल्याची माहिती उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांनी दिली. या सर्व अनधिकृत शाळांची यादी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच, शिक्षण हक्क कायद्यानुसार या अनधिकृत शाळांना ५२ कोटी रुपयांचा दंडही करण्यात आल्याचेही उपायुक्त सांगळे यांनी सांगितले.

अनधिकृत शाळांपैकी सर्वात जास्त शाळांची संख्या दिवा प्रभाग समिती क्षेत्रात आहेत. त्या अनुषंगाने दिवा प्रभाग समितीने या अनधिकृत शाळांविरुद्ध कार्यवाही सुरू केलेली आहे. आतापर्यंत ३२ अनधिकृत शाळांची नळ जोडणी खंडित केली आहे. या अनधिकृत शाळांच्या बाबतीत शहर विकास विभागाकडील अनधिकृत बांधकामाच्या यादीनुसार अतिक्रमण विभागाकडूनही कार्यवाही प्रस्तावित आहे.

ज्या अनधिकृत शाळा नियमित होऊ शकतील त्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी मांडली आहे. ८१ पैकी ०५ शाळांनी त्यादृष्टीने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याचा प्रस्ताव दिला आहे. उर्वरित ७६ शाळांकडून असा कोणताही प्रस्ताव आलेला नाही. त्यांना आणखी एक संधी द्यावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी त्यांना नजिकच्या अधिकृत शाळांमध्ये समायोजित करण्याचाही विचार केला जात आहे. त्यास १९ खाजगी शाळांनी तयारी दाखवली असल्याचे सांगळे यांनी स्पष्ट केले.


दैनिक संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३१३२०२

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक**

**अनाधिकृत शाळा बंद करण्याची मागणी**

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील अनधिकृत शाळा या अनधिकृत इमारतीमध्ये सुरू आहेत. ठा.म.पा व महाराष्ट्र शासन आदी कोणत्याही प्रकारच्या शासकीय परवानगी न घेता खुलेआम मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या अनाधिकृत शाळेमध्ये शिक्षणाचा दर्जा कितपत चांगला आहे हे सांगता येत नाही. कारण शासनाच्या कोणत्याही प्रकारचे अंकुश इथे नाही. तसेच दिवा शहरातल्या बऱ्याशा शाळेत महिला व पुरुष सुरक्षा रक्षक यांची चारित्र्य पडताळणी झालेली नाही, स्वच्छतागृह पुरेशेत सी.सी.टी.व्ही कॅमेरे चालू स्थितीत आहेत की नाही आदी कोणत्याही गोष्टींची पूर्तता न करता व कोणाचेही भय नसल्यासारखे खुलेआम सुरू आहेत. काही दिवसापूर्वी दिवा शहरातील स्मार्ट एज्युकेशन इंग्लिश स्कूल मध्ये घडलेला निंदनीय प्रकार पुन्हा दिवा शहरात होऊ नये. व अनाधिकृत शाळेमध्ये शिक्षणाचा दर्जा चांगल्या नसल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांच्या भविष्याचे नुकसान होऊ नये. म्हणून दिवा शहरातील अनाधिकृत शाळा कायमस्वरूपी बंद करून व त्यांच्या संस्थाचालकांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावं अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शहरप्रमुख सचिन पाटील यांनी केली आहे. प्रशासनाने येणाऱ्या काही दिवसात अनाधिकृत शाळा व त्यांच्या संस्थाचालकांवर गुन्हा दाखल केला नाही तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

Main Edition - 30 Dec 2024 - Page 1

Powered By Aksharaj Media



### अक्षराज बातमीचा इम्पॅक्ट, शिवसेनेच्या प्रयत्नांना यश

शिवसेना बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख सचिन पाटील यांनी बेकायदा शाळा विरोधात आवाज उठवला होता. ही बातमी अक्षराज वृत्तपत्रात छापून आली होती. सचिन पाटील त्यांच्या ह्या सतत पाठपुराव्याला तसेच शिक्षणाधिकारी ह्यांना भेटून अशा शाळावर कारवाई करण्यासाठी निवेदन देण्यात आले होते. वारंवार निवेदन दिल्यानंतर शेवटी आदोलनाचा इशारा दिल्यानंतर प्रशासनाला जाग आली आहे. अशा शाळांवर पोलिस प्रशासनाने एफ.आय.आर. नोंदवण्यात आला आहे. त्यामुळे बेकायदा शाळांवर चाप बसला आहे. अक्षराज वृत्तपत्राची बातमीची दखल प्रशासनाला द्यावी लागली आणि सचिन पाटील यांच्या प्रयत्नामुळे शक्य झाले आहे. अशी प्रतिक्रिया सचिन पाटील यांनी दिली आहे.

# महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर शोभायात्रेत उसळला जनसागर

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** सावनेर तालुक्यातील दहेगाव (रंगारी) खापरखेडा मार्गावर असलेल्या श्रीराम दरबार मंदिर परिसरात भव्य ज्योतिर्लिंग मंदिर स्थापना करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्रीचे औचित्य साधून मंदिराचे संस्थापक बबलू ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य शोभयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ.राजीव पोतदार आवर्जून उपस्थित होते. महाशिवरात्री पावन पर्वावर दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटेच्या सुमारास ज्योतिर्लिंग मंदिराचे स्नान व विविध पूजाअर्चना करून रुद्राभिषेक करण्यात आला. यावेळी मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ६ वाजता श्री राममंदिर प्रकाशनगर वसाहत येथून शोभयात्रेला सुरुवात करण्यात आली.

यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मनोहर कुंभारे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोर चौधरी, रामराव मोवाडे, उत्तम कापसे, हेमराज परिहार, कृष्णा यादव, विलास महल्ले, श्रीराम डाखरे, बबलू मित्तल, सुशील भंडारी, लखन पटेल, विश्वजित सिंग, डॉ.सूर्यकांत सिंग, अशोक झिंगरे, अमर जैन, अशोक वंजाळ, मयूर जैन, अशोक शर्मा, सुमित वंजाळ, नारायण गुरव, अविनाश बांगरे, जैनदास जैन, लालू बतरा, संतोष राय, पवन धर्वे, संजय अभ्यंकर, नितीन पुरी, रतन ठाकूर, जग्गू ठाकूर, गिरधारी शर्मा, योगेश जालंदर, विनित यादव, रणजित सिंग, निलेश चंदेल, मंजुश्री ठाकरे, मिनाक्षी अभ्यंकर, केशरी नन्नावरे, शारदा अढाऊ, अर्चना सिरभाते, रजनी ठाकूर, गीता ठाकरे, सरोज बत्रा रंजिता वाहने, कांचन सावरकर सारिका जळीतकार, दीपाली अडकीने, वैशाली कराडे, आदी उपस्थित होते. याप्रसंगी शोभायात्रेत घोडे, लष्कर बॅन्ड, डि.जे.साउंड, बग्गी,



आकर्षक रोषणाई, भजन मंडळासह राम-लक्ष्मण-सिता, हनुमान, शंकर पार्वती, शिवाजी महाराज, झाशीची राणी, महाराणा प्रताप, तानाजी मालुसरे, राम, लक्ष्मण, सीता, राधा कृष्ण, हनुमान, शंकर, पार्वती, जटायू, भरत, शत्रुघ्न, आदि चिमुकल्याच्या सजीव झाक्या सामील करण्यात आल्या होत्या.

शोभयात्रे दरम्यान शिव तांडव नृत्य मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरले.शोभायात्रा मार्गावर शरबत, मठ्ठा, आईस्क्रीम, दूध, साबुदाना खिचडी, यासह विविध नस्त्यांचे वितरण विविध राजकीय व सामाजिक संघटनाकडुन करण्यात आले होते. ठिकठिकाणी शोभा यात्रेचे स्वागत करण्यात येत होते.

शोभायात्रा बघण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा शेकडोच्या संख्येत नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी जोरदार फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. शोभायात्रा राममंदिर, पोलीस स्टेशन, रेल्वे चौकी, अन्नामोड, मिलनचौक आदि परिसरातून भ्रमण करून श्री राम दरबार मंदिरात समारोप करण्यात आला. यावेळी हजारो नागरिकांना फराळाचे वितरण करण्यात आले.

# पंढरपूरच्या आमसभेत बेकायदा वाळू उपसा रस्ते, वीज, पाण्यासह समस्यांचा पाऊस

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२७, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी येथील पंचायत समिती कार्यालय प्रांगणात आज माढा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांचे अध्यक्षतेखाली आमसभा पार पडली. पंढरपूर तालुका सांगोला, मोहोळ, पंढरपूर-मंगळवेढा व माढा या चार विधानसभा मतदारसंघात विभागलेला आहे. त्यामुळं या चारही मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत आमसभा आयोजीत करण्यात आली होती.

यावेळी सामान्य जनतेच्या अडचणी जाणून घेत त्या अडचणी सोडविण्यासंदर्भात होत असलेल्या दिरंगाई बाबत उपस्थित आमदारांनी संबंधित विभाग प्रमुखांना जाब विचारत चांगलेच धारेवर धरल्याचे दिसून आले. पंढरपूर शहरांतर्गत रस्ते ग्रामीण भागात उजनी डावा वितरीकेच्या मध्यमातून सिंचनासाठी पाणी सोडताना अधिकार्यांकडून दुजाभावाची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप यावेळी शेतकऱ्यांनी केला. तुगतच्या सरपंच डॉ.अमृता रणदिवे यांनीही तुंगत याठिकाणी असलेल्या ओढ्याला सिंचनासाठी कित्येक वर्षापासून पाणी



सोडण्यात आले नसल्याचा मुद्दा उपस्थित केला.

पंढरपूर तालुका हा सांगोला मोहोळ पंढरपूर मंगळवेढा व माढा या चार विधानसभा मतदारसंघात विभागलेला आहे. त्यामुळे आजच्या आमसभेत पंढरपूरचे भाजप आमदार समाधान आवताडे, माढ्याचे शरद पवार गटाचे आमदार अभिजीत पाटील, मोहोळचे शरद पवार गटाचे आमदार राजू खरे आणि सांगोल्याचे शेकापचे आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख उपस्थित होते.

या आमसभेत पंढरपूरच्या वाळू आणि मुरुम उपसाबाबत नागरिक संतप्त होते. यावर सामाजिक कार्यकर्ते अरुण

पंढरपूरच्या आमसभेत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मोहोळचे आमदार राजू खरे यांनी बेकायदा वाळू उपशावर जोरदार निशाणा साधला. जर मी माझ्या तालुक्यातील बेकायदा वाळू उपसा बंद करू शकतो तर सत्ताधारी आमदाराला हे का शक्य होत नाही? असा सवाल करत खरेंनी आमसभा गाजवून सोडली.

कोळी यांनी आम सभेत पंढरपूरच्या बेकायदा वाळू उपसा बाबत विचारले असता मोहोळचे आमदार राजू खरे आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. मी जर माझ्या मोहोळ तालुक्यातील बेकायदा वाळू उपसा बंद करु शकतो तर तुम्ही भाजपचे आमदार असून येथील वाळू का बंद होत नाही? असा सवाल राजू खरे यांनी पंढरपूरचे भाजप आमदार समाधान आवताडे यांना केल्याचं पाहायला मिळालं. जर मी विरोधी पक्षाचा आमदार असूनही माझ्या मतदारसंघातील बेकायदा वाळू आणि मुरूम उपसा १०० टक्के बंद करू शकत असेल तर पंढरपूरचे आमदार हे सत्ताधारी भाजपचे आहेत, मग त्यांना का शक्य होत नाही? असा सवाल राजू खरे यांनी केला. माझ्या मोहोळमध्येही मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू होता.

याबाबत मी तहसीलदार आणि पोलिसांना तक्रारी करुनही हा बेकायदा वाळू उपसा बंद झाला नाही. यानंतर आपण या वाळू उपशाचे शूटिंग काढून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दाखवल्यावर तातडीने जिल्हाधिकाऱ्यांच्या पथकाने कारवाई करत मोहोळ तालुक्यातील सर्व बेकायदा वाळू व मुरूम उपसा बंद करुन दाखवला.

जर मी विरोधी पक्षाचा आमदार असून हे करु शकतो तर सत्ताधारी पंढरपूरचे आमदार समाधान आवताडे यांना काय अवघड आहे? असा सवाल खरेंनी केला. दरम्यान, यानंतर आमदार समाधान आवताडे यांनी आक्रमक होत वाळू उपसा होणाऱ्या ठिकाणी तहसील आणि पोलिसांचा एक एक कर्मचारी ठेवावा अशी मागणी केली. तसेच वारंवार अशा गुन्ह्यात सापडणाऱ्यांवर तातडीने मकोका कायदा लावावा असे आदेश देखील त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

पंढरपूर पंचायत समिती याठिकाणी झालेल्या आमसभेत विविध प्रशासकीय विभागामधिल कर्मचाऱ्यांवर गंभीर आरोप झाले. याठिकाणचे कर्मचारी शासकीय कामांसाठी प्रथम पैशांची मागणी करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला.

# थोडक्यात

## महाशिवरात्री निमित्त खिडकाळेश्वर मंदिरात भक्तांची अलोट गर्दी; आकर्षक सजावट




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२६, खिडकाळी (डोंबिवली) :** महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर डोंबिवली खिडकाळी येथील पांडवकालीन खिडकाळेश्वर मंदिरात भाविकांनी मोठी गर्दी केली. रात्रीपासूनच दर्शनासाठी भाविकांची रांग लागत असून मंदिरात भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. मंदिराला आकर्षक फुलांनी सजवण्यात आले सुंदर रांगोळी ही रेखाटण्यात आली आहे. विविध भागांतून आलेल्या भाविकांनी रात्रीपासूनच रांगा लावत भगवान शंकराचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात हर हर महादेव आणि ओम नमः शिवायच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले. भाविकांसाठी मंदिर प्रशासनाने विशेष व्यवस्था केली असून महापूजेचा कार्यक्रम, रुद्राभिषेक आणि प्रसाद वितरणाचेही आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्री निमित्त शिवभक्तांचा उत्साह आणि श्रद्धेने भारलेले खिडकाळेश्वर मंदिर भक्तांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

## आपधुपच्या उपसरपंच पदी अलका गवळी यांची बिनविरोध निवड




**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२४, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील आपधुप गावच्या उपसरपंच पदी अलका गवळी यांचीबिनविरोध निवड करण्यात आली. आपधुप गाव म्हणजे पारनेर तालुक्यातील देवस्थान पैकी जागृत देवस्थान श्री खंडोबाचे आसल्याने तेथे भाविंकाची दर्शनासाठी नेहमी ये-जा असते. आपधुप गावच्या सार्वागिन विकासासाठी, राजकीय हितसबंध बाजुला ठेवुन येथील ग्रामस्थांची एकजूट पहावयास मिळते. गावचा सर्वांगीण विकास होण्याच्या हेतूने अलका गवळी यांची उपसरपंचपदी बिनविरोध अशी निवड करण्यात आली.त्या प्रसंगी सरपंच मिनाक्षी गवळी, सरपंच अजिंक्य गवळी, शितल गवळी, सचिन कसबे, सर्व सेवा संस्थाचे चेअरमन, व्हा चेअरमन, ग्रामपंचायतीचे सदश्य, आजी-माजी सैनिक, संघटनांचे पदाधिकारी, श्री खंडोबा देवस्थानचे विश्वस्थ, सभासद, तरूण युवक, महिला वर्ग यांच्या उपस्थित ग्रामविकास अधिकारी सुंबे यांच्या प्रमुख उपस्थित बिनविरोध उपसरपंच म्हणून अलका यांची निवड करण्यात आली.

## सिद्धी शिर्केची अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड




**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.२७, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** परिक्रमा शैक्षणिक संकुलनाची महिला खेळाडू कु.सिद्धी शिर्के हिची भुवनेश्वर येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ सायकलिंग ट्रॅक इव्हेंट या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सिद्धी ही परिक्रमा शैक्षणिक संकुलनातील अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड होणारी पहिली महिला खेळाडू आहे. तिच्या या यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलनाचे संस्थापक, माजी मंत्री बबनराव (दादा) पाचपुते, अध्यक्षा डॉ.प्रतिभा पाचपुते, सचिव आमदार विक्रमसिंह बबनराव पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड.प्रतापसिंह बबनरावजी पाचपुते, अकॅडमीक डायरेक्टर प्रा.इंद्रायणी पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.अनिल पुंड, डेप्युटी डायरेक्टर डॉ.प्रा.संजीव कदम पाटील, प्राचार्य मोहन धगाटे, प्राचार्य डॉ.सुनील निर्मळ, प्राचार्य डॉ.सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ.रमेश शिंदे, प्राचार्य डॉ.प्रशांत सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.पांडुरंग इथापे यांनी सिद्धीचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सिद्धीला परिक्रमा क्रीडा विभागाचे मार्गदर्शन लाभले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, बुलडाणा :** ज्येष्ठ कवी वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधुन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. मराठी भाषेचा वापर प्रत्येकाने संवादासाठी करणे गरजेचे असून मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकाची असल्याची भावना निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्य 'घेऊ या एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा' हा संदेश देत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, अधीक्षक अजित जंगम तसेच अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. स्टेट बँक ऑफ इंडियाचे मकरंद आपटे यांनी आर्थिक साक्षरता संदर्भात माहिती देऊन बँकेव्दारे चालवण्यात येणाऱ्या निवृत्त योजना, टर्म प्लॅन, मुलांच्या शिक्षणाकरिता असलेल्या योजना, गुंतवणूक योजना अशा विविध योजनाची माहिती दिली. तसेच बँकेचे व्यवहार ऑनलाईन झाले असून युनो ॲपचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.